**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स् गेल (इंडिया) लिमिटेड, भारत सरकार उपक्रम यांचा प्रस्तावित ५०० केटीए क्षमतेचा प्रोपेन डीहायड्रेशन व पॉली प्रॉपीलीन युनिट एकत्रित प्रकल्प गाव-उसर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे उभारणेबाबत दिनांक २१/०६/२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरणविषयक जन सुनावणीबाबतचे इतिवृत्त.**

---

भारत सरकारच्या पर्यावरण, वने, हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर ,२००६ व सुधारीत दि. १ डिसेंबर ,२००९ च्या अधिसूचनेनुसार प्रकल्प प्रवर्तक मेसर्स् गेल (इंडिया) लिमिटेड, भारत सरकार उपक्रम यांनी त्यांच्या गाव-उसर, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे प्रस्तावित ५०० केटीए क्षमतेचा प्रोपेन डीहायड्रेशन व पॉली प्रॉपीलीन युनिट या एकत्रित प्रकल्प उभारणेबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा अर्ज सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू बिल्डिंग, ३रा मजला, सायन, मुंबई – ४०००३२ यांना दिनांक १९/१०/२०१८ रोजी सादर केला की जो उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ रायगड-२ यांना दि. ०५/११/२०१८ रोजी प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ रायगड-२ जनसुनावणी दि. २५/०३/२०१९ रोजी निर्धारीत केली. तथापी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ च्या आचार संहितेमुळे उपविभागीय दंडाधिकारी, अलिबाग यांनी दि. २०/०३/२०१९ च्या पत्रान्वये सदरची जनसुनावणी पुढे ढकलण्यात यावी असे निर्देशित केले. यानंतर सदरची जनसुनावणी पुनश्च: दि. २१/०६/२०१९ रोजी निर्धारीत केली.

उपरोक्त अधिसूचनेनुसार, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दिनांक २६/१०/२०१७ रोजी सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरण अभ्यास रुपरेषेस (टीओआर) मंजूरी प्रदान केली.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक अभ्यास रुपरेषा मंजुरी दिनांक २६/१०/२०१७ (अधिसूचना दिनांक १४/०९/२००६ व ०१/१२/२००९) नुसार, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, मप्रनि मंडळ, रायगड भवन, नवी मुंबई यांनी जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र रायगड टाइम्स यामध्ये मराठीमधून व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यामध्ये इंग्रजीमधून दिनांक २०/०५/२०१९ रोजी उपरोक्त प्रकल्पाबाबत आयोजित करण्यात आलेल्या जनसुनावणी बैठकीची जाहिर सूचना जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती विभागीय कार्यालय – पर्यावरण वने, हवामान बदल मंत्रालय ,भोपाळ, मा.जिल्हादंडाधिकारी कार्यालय - रायगड ,मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय – रायगड, जिल्हा परिषद - रायगड ,जिल्हा उद्योग केंद्र - रायगड ,उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी -अलिबाग उपविभाग अलिबाग, तहसील कार्यालय अलिबागच्या मागे, अलिबाग, जिल्हा-रायगड, तहसील कार्यालय- अलिबाग, तालुका अलिबाग ,जिल्हा-रायगड ,अलिबाग नगरपरिषद, अलिबाग, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, ग्रामपंचायत कार्यालय – उसर, तालुका –अलिबाग ,जिल्हा-रायगड व ग्रुप ग्रामपंचायत कार्यालये – खानाव, बेळोशी, तालुका –अलिबाग ,जिल्हा-रायगड मुख्यालय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुंबई ,प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई, उप प्रादेशिक कार्यालय,रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,

सीबीडी बेलापुर, नवी मुंबई ,पर्यावरण विभाग ,मंत्रालय- मुंबई व मप्रनि मंडळाच्या संकतेस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते .

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी दिनांक २१/०६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता श्री गणेश मंगल कार्यालय, सहाण, बायपास रस्ता सहाण, अलिबाग रोहा रस्ता, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे आयोजित करण्यात आलेली होती. सदस्य सचिव ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. ई- ३८/२०१९ ,द्वारा पत्र क्र. बीओ/जेडीडब्ल्युपीसी/पीएच/बी-२१६८ , दिनांक २०/०६/२०१९ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली:-

१) अप्पर जिल्हादंडाधिकारी ,रायगड - **अध्यक्ष**
(मा. जिल्हादंडाधिकारी रायगड यांचे प्रतिनिधी)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड
मप्रनि मंडळ यांचे प्रतिनीधी

३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२ - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड

उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, मप्रनि मंडळ तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माननीय अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती. सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी, प्रकल्प प्रवर्तक यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या परवानगीने जनसुनावणी बैठकीची पध्दत विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने, हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर ,२००६ व सुधारीत दिनांक १ डिसेंबर ,२००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे, मप्रनि मंडळास उपरोक्त प्रकल्पाबाबत प्रस्ताव प्राप्त झाला. समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पुढे माहिती दिली का सदरहू प्रकल्प हा सवर्ग ए ५ ( सी) मध्ये मोडत असून प्रकल्प कार्यान्वित करण्याअगोदर आगाऊ पर्यावरण अनुमती व त्यासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्याने सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी आयोजित करण्याअगोदर सर्व वैधानिक प्रक्रिया पाळण्यात आलेल्या आहेत उदा.- जनसुनावणी आयोजित करणेअगोदर ३० दिवस वृत्तपत्रात जाहिर सूचना जनतेच्या माहितीसाठी प्रसिध्द करणे.

समन्वयक यांनी माननीय अध्यक्षांच्या परवानगीने, प्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी उपस्थितांना सादरीकरण करण्याची सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, रायगड यांनी उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत संपूर्ण माहिती सादरीकरणाव्दारे स्थानिक भाषा मराठीत सांगण्याची सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थिताना आवाहन केले की सादरीकरण शांततेने ऐकून नंतर काही सूचना, आक्षेप वा टिकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात. सदरहू सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी सादरीकरणाव्दारे प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण व्यवस्थापन योजना व आपत्कालिन व्यवस्थापन योजना स्थानिक भाषा मराठीतून सांगितल्या.

सादरीकरणानंतर प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, रायगड तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सदरहू प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना नोंदविण्याअगोदर नाव व गाव सांगण्याचे त्यांना आवाहन केले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सदरहू प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. त्यांना संबंधितांना सूचना उपस्थित करणा-या व्यक्तीचे नाव व गाव घेण्याची सूचना केली.

**<u>खालील उपस्थितांना चर्चेत भाग घेतलाः-</u>**

**<u>१) श्री गजानन पाटील, राहणार-खानाव गाव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-</u>**

श्री गजानन पाटील यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्पासाठी मोठीमोठी आश्वासने देऊन १९८३ साली स्थानिकांच्या जमिनी अधिग्रहित करण्यात आल्या. मात्र अनुभव अत्यंत वाईट आहे. सुमारे २१५ हेक्टर जमिन अधिग्रहित करण्यात आली. किती प्रकल्पग्रस्त आहेत त्यांची संख्या मिळेल काय अशी विचारणा केली. मात्र प्रकल्पग्रस्त व शेतकरी यांना प्रकल्पात समाविष्ट करुन घेण्यात आलेले नाही. स्थानिकांच्या माहितीनुसार २४६ खातेदार होते. फक्त २३ खातेदारांना नोक-या मिळाल्या. बाकीच्यांना गेले ३६ वर्षे न्याय मिळालेला नाही. सर्व प्रकल्पग्रस्तांची यादी व सद्यस्थिती याची यादी प्रकल्प प्रवर्तकांनी उपलब्ध केलेली नाही. ती त्वरित करण्यात यावी.

तरी स्थानिक तरुण तरुणींना प्रकल्पात नोक-या व स्थानिकांना प्रकल्पात सहकार्य करण्याचे बंधन प्रशासनाने घालावे. त्याचप्रमाणे जमिन अधिग्रहित करताना भाव कमी देण्यात आला. तरी नविन धोरणानुसार बाजारभावाच्या पाच पटीने रक्कम देशातील इतर सर्व प्रकल्पग्रस्तांना अदा करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे ती रक्कम या प्रकल्पातील सर्व प्रकल्पग्रस्तांना त्वरित अदा करण्यात यावी.

श्री. पाटील यांनी पुढे नमुद केले की ज्याप्रमाणे परिसरातील आर.सी.एफ. कंपनीने प्रकल्प सुरु होण्याची प्रक्रिया सुरु होताना प्रकल्पग्रस्तांतील पात्र स्थानिक युवक युवतींना प्रशिक्षण दिले व प्रकल्प सुरु झाल्यावर नोक-या दिल्या. तसे धोरण राबविण्याचे या प्रकल्पाबाबत प्रकल्प प्रवर्तकांना बंधनकारक करावे.

**२) श्री अनंत नारायण गोंधळी, राहणार-खानाव गाव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

यांनी सूचना नोंदविण्याअगोदर स्थानिकांच्या मराठीत भाषेत सादरीकरण तयार करुन ते सादर करण्याचे आदेश प्रकल्प प्रवर्तांना दिल्याबद्दल पर्यावरणविषयक जाहिर सुनावणी समितींच्या अध्यक्षांचे आभार मानले.

यांनी आक्षेप नोंदविला की १९८१ साली स्थानिकांच्या जमिनी अधिग्रहित करण्यात आल्या. त्यातील फक्त २४ लोकांनाच नोक-या देण्यात आल्या. अद्यापपर्यंत न्याय मिळालेला नाही. त्यांना प्रकल्पात नोक-या देत नाही. त्यामुळे उदरनिर्वाहाचे साधन नाही. सर्व प्रकल्पग्रस्तांना दाखला/सर्टिफिकेट देण्यात आलेले होते. आता त्यांना नातू झाला तरी नोक-या नाहीत.

त्यांनी सूचना केली की प्रकल्पातील पदांची यादी प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात यावी व सक्षम उमदेवारांना कमीतकमी सहा महिन्यांचे प्रशिक्षण देऊन रोजगारीची संधि देण्यात यावी. याबाबत प्रकल्प प्रवर्तकांशी लेखी करार होणे आवश्यक आहे.

**३) श्री श्रीधर मधुकर भोपी, राहणार-बेलोशी गाव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

स्थानिक लोक प्रकल्पाच्या विरुध्द नाहित. तर त्यांचा प्रकल्पास पाठिंबा आहे. मात्र प्रकल्पग्रस्त व शेतक-यांचे अनेक वर्षांचे प्रश्न सोडविण्यात यावेत. शेतक-यांना हमीभाव देण्यात आले. त्यामध्ये व आताच्या भावामध्ये फारच तफावत आहे. सर्व प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्यात यावे. शेतकरी आर्थिकदृष्टया सक्षम व्हावा याची काळजी घेणे आवश्यक आहे. शेतक-यांचे व प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावावेत. त्यासाठी प्रकल्प प्रशासनासोबत लेखीस्वरुपात करार करण्यात यावा.

त्यांनी पुढे सूचना केली की स्थानिक शाळेतील मुलांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी योजना आखावी, परिसरातील विहिरी, तलाव विकसित करावे. परिसरात हॉस्पिटल बांधावे. या सर्व मुद्द्यांचा समावेश लेखी स्वरुपातील करारात करण्यात यावा.

**४) श्री सचिन कृष्णा शिंदे, राहणार-उसर गाव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

सदरहू प्रकल्प दोन ग्रामपंचायतीत येतो. मात्र उसर गावात कुठलेही विकासाचे काम हाती घेण्यात आलेले नाही. शेतक-यांच्या व प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नात लक्ष घालावे. मागील अनुभव वाईट आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिक युवक युवतींसाठी कौशल्यविकास कार्यक्रम हाती घ्यावा. त्यासाठी स्थानिक लोकांचा व स्थानिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक अहर्ता व कौशल्यविकास याबाबत सर्वेषण होणे गरजेचे आहे. त्याचे प्रकल्पास योगदानच होणार आहे.

त्याचप्रमाणे प्रकल्पाभोवती राहणा-या लोकांचा विमा काढण्यात यावा. सर्व उपस्थित केलेल्या सूचनांसाठी स्थानिकांची एक समिती गठित करण्यात यावी. त्यांनी प्रत्येक मुद्द्यांवर प्रकल्प प्रवर्तकांशी चर्चा करुन अंतिम मसुदा तयार केल्यावर प्रकल्पास मान्यता देण्यात यावी.

**५) श्री निलेश गायकर, राहणार-उसर गाव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

श्री निलेश गायकर यांनी सूचना केली की नविन प्रकल्पात ६०० मनुष्यबळाची गरज लागणार आहे. तर प्रकल्पग्रस्त व स्थानिकांतील बाधित २२५ व्यक्तींना प्रथम प्रकल्पात सामावून घेण्यात यावे. मगच प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण अनुमती प्रदान करण्यात यावी. त्यांनी पुढे सूचना केली की प्रकल्प प्रक्रियेत नायट्रेट व

सल्फेट यांच्या उत्सर्जनामुळे आजूबाजूस होणा-या दुष्परिणामाचे नुकसान भरपाई धोरण निश्चित करण्यात यावे. परिसरात पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर आहे. सीएसआर फंडातून उसर गावात एकही काम करण्यात आलेले नाही. फक्त एक बसथांबा बांधला व सर्व सीएसआर निधी बाहेर वापरण्यात आला.

तरी सर्व बाधितांना नोक-या द्या. त्यासाठी प्रत्येक गावातील दोन सभासद घेऊन समिती गठित करण्यात यावी व रोजगाराची संधि देण्यात यावी.

**६) श्री अशोक कर्णिकर, राहणार-उसर गाव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

श्री कर्णिकर यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्पग्रस्त २५० असताना फक्त २२-२३ लोकांनाच रोजगाराची संधि देण्यात आलेली आहे. तर फक्त ५% लोकांनाच शेतीची भाववाढ मिळाली. २५% लोकांना शेतीची भाववाढ मिळालेली नाही.

श्री गजानन पाटील, राहणार-खानाव गाव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड यांनी सर्व उपस्थितांना आवाहन केले की चर्चा केलेल्या सर्व मुद्द्यांचे निराकरण करण्यासाठी स्थानिकांनी एकजूट होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व पक्षीय समिती गठीत करुन आपल्या मागण्या पूर्ण करु. सूचनेप्रमाणे एकत्रित लेखी करार करु. त्यासाठी त्यांनी स्थानिक समुहाने आणलेले लेखी निवेदन पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांसमोर सादर करणार असल्याची माहिती दिली व गठित समितीशी प्रशासनाने चर्चा केल्यावरच प्रकल्प प्रवर्तकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांच्या संबंधित अधिका-यांना मंचावर येऊन स्थानिकांचे निवेदन स्विकारण्याचे आदेश दिले. प्रकल्प प्रवर्तकांना निवेदन स्विकारले.

उपस्थितांनी चर्चेतील सूचना, आक्षेप याबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर व स्पष्टीकरण द्यावे अशी मागणी केली. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना चर्चेतील मुद्द्यांचे स्पष्टीकरण देण्याचे आवाहन केले.

प्रकल्प अधिका-यांनी माहिती दिली की सदरहू प्रकल्प हा भारत सरकारचा उपक्रम आहे. प्रकल्प सुरु असताना सीएसआर फंडांतर्गत पाच कोटी खर्च करण्यात आले. गेले पाच वर्षे प्रकल्प बंद आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की जुन्या प्रकल्पात २४३ पैकी २३ स्थानिक प्रकल्पगस्तांना सरळ सेवेमध्ये सामावून घेतलेले आहे. आता नविन प्रकल्पासाठी अतिरिक्त जमिन लागणार नसल्याची त्यांनी माहिती दिली. नविन प्रकल्पात भारत सरकारच्या नियमांप्रमाणे भरती करण्यात येणार असल्याची त्यांनी माहिती दिली व सदस्य श्री साळुंखे यांनी मुद्देसुद उत्तर देण्याची सूचना केली. यावेळी स्थानिकांनी आपल्या नकाराच्या भावना तीव्रतेने नोंदविल्या.

श्री गजानन पाटील राहणार-खानाव गाव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड यांनी सांगितले की वृत्तपत्रातील बातमीप्रमाणे या बैठकीस प्रकल्पातील वरिष्ठ अधिकारी श्री ए. के. झा उपस्थित राहणार होते. जर ते नसतील, तर वरिष्ठ स्तरातील अधिका-यांनी उत्तरे द्यावी. या मागणीस सर्व उपस्थितांना पाठिंबा दिला.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की सर्व सुचनांची नोंद घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे रेकॉर्डिंग व व्हिडिओ शुटींगही होत आहे. त्याची दखल वरिष्ठ पातळीवर घेणार आहेत. सदरहू सूचना राज्य शासनाच्या प्रशासनासमोरही मांडणार आहोत. जे विषय त्यांच्या कार्यकक्षेत

येत नसतील, त्याचे ते उत्तर देऊ शकणार नाही. तरी उपस्थितांनी त्यांच्या भावना कायद्याच्या चौकटीत मांडाव्यात.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की सदरहू बैठक ही स्थानिकांच्या प्रकल्पाबाबत असणा-या सूचना, आक्षेप यासाठीच आयोजित करण्यात आलेली आहे.

उपस्थितांच्या मागणीनुसार प्रकल्प प्रवर्तकांचे वरिष्ठ अधिकारी यांनी उपस्थितांच्या सूचनांना उत्तर देण्यास सुरवात केली. त्यांनी सांगितले की प्रकल्पास गॅस नसल्याने गेले पाच वर्षे बंद होता. स्थानिकांना दिलेल्या आश्वसनांप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना रोजगार देण्यात येईल.

त्यांनी सांगितले की सीएसआर फंडाबरोबरच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार सीईआर म्हणजे कॉर्पोरेट पर्यावरण फंडातून परिसरातील पर्यावरण संवर्धनासाठी खर्च करण्यात येईल. प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात पाच वर्षाकरीता दरवर्षी ३.७ कोटी रुपये पर्यावरण निधीतून खर्च करण्यात येईल. ही जनसुनावणी स्थानिकांच्या गरजा, मागण्या प्रकल्प प्रवर्तकांना समजण्यासाठीच आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील स्थानिकांचे जीवनमान, आर्थिक स्थैर्य निश्चितच वाढणार आहे. स्थानिकांच्या सहकार्याशिवाय कुठलाही प्रकल्प हा यशस्वी होत नाही. सदरहू प्रकल्प प्रशासन हे भारत सरकारच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायु मंत्रालयांतर्गत कार्यरत असून सदरहू प्रकल्प हा भारत सरकारचा उपक्रम असल्याने आम्हांला कोणाशीही लेखी करार करण्याचा अधिकार नाही. प्रकल्प प्रशासनास भारत सरकारचे सर्व नियम पाळणे बंधनकारक आहे. सदरहू प्रकल्पातील प्रक्रिया ही भारतात सर्वात प्रथम कार्यरत होणार आहे.

श्री संदीप पाटेकर, स्थानिक रहिवाशी यांनी निर्दशनास आणले की स्थानिकांना प्रकल्पातील भरतीबाबत कल्पनाच नसते. बाहेरुन माणसे येऊन त्यांना नोक-या देण्यात येतात. प्रकल्प अधिकारी यांना उत्तर दिले की प्रकल्पातील अधिकारी हे संपूर्ण भारतीय स्तरावर नियुक्त करण्यात येतात, तर निम्न स्तरावरिल कर्मचारी जे कुशल, अर्धकुशल व अकुशल (Skilled, Semi-skilled and Unskilled) आहेत, ते स्थानिक रोजगार केंद्रातून नियुक्त करण्यात येतात. त्यांनी प्रकल्पास सहकार्य करण्याचे आवाहन केले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी मध्यस्थी करत सांगितले की त्याच त्याच मुद्यांवर स्थानिक चर्चा करत आहेत. सर्व मुद्द्यांवर चर्चा झालेली असून सर्व मुद्दे सर्वांना समजले आहेत. स्थानिकांमध्ये गोंधळ निर्माण होण्यासाठी काहीजण तेच तेच मुद्दे विचारत आहेत. पूर्ण चर्चेनंतर खालीलप्रमाणे भाष्य करत येईल –

१) बैठकीत उपस्थित केलेल्या सूचनेनुसार स्थानिकांच्या ज्या काही समस्या आहेत, त्यासाठी एक समिती नेमावी. त्याबाबत जिल्हा दंडाधिका-यांकडे समिती गठित करण्ऱ्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.

२) ज्या उर्वरित प्रकल्पग्रस्तांना काहीही मिळाले नाही, त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यांना प्रकल्प प्रवर्तक कसे सामावून घेणार वा त्यांना मोबदला कसा देणार याबाबत प्रकल्प प्रवर्तकांकडे पाठपुरावा करणे.

३) सदरहू प्रकल्प हा तीन ते चार वर्षांनी कार्यरत होणार आहे. किंबहुना जास्तही वेळ लागू शकतो. तर चार वर्षांनी विविध संवर्गात रोजगार किती उपलब्ध होईल, याबाबत कंपनीचे धोरण (policy)

प्रकल्प प्रशासनाने गठित समितीस माहिती उपलब्ध करुन देणे व जास्तीतजास्त प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना रोजगाराची संधि उपलब्ध करुन देणे.

४) हा भारत सरकारचा उपक्रम असून ८००० कोटी रुपयांची प्रकल्पात गुंतवणूक आहे. प्रकल्प कार्यरत झाल्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सीएसआर फंड स्थानिक गावातील योजनांसाठीच खर्च करणे, त्यासाठी त्याचे अंदाजपत्रक व खर्चाचा वार्षिक अहवाल उपलब्ध करणे याबाबत जिल्हा प्रशासनाने प्रकल्प प्रवर्तकांना सूचना देणे.

५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (MIDC) पूर्वी भूसंपादन केलेल्या खातेदारांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देणे. सदरहू बैठकीत सर्व मुद्द्यांवर चर्चा झाली. काही खातेदार दराबाबत न्यायालयात गेलेले आहेत. सदरहू प्रश्न सामोपचाराने सोडविण्याची एमआयडीसीचीही तयारी असून त्यांच्या उत्तराची वाट पहात आहोत.

६) सदरहू प्रकल्प हा भारत सरकारचा आहे. ज्या कारणांसाठी जमिन मागितली, त्या कारणांसाठीच ती वापरली जाते. किंमत मागण्याचा अधिकार प्रकल्पग्रस्तांना आहे. त्याबाबत एमआयडीसीकडे सादरीकरण करण्यात आलेले आहे. एमआयडीसी हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असून त्यांना निर्णय हा शासकीय धोरणांनुसारच घ्यावा लागतो. तर त्यास काही वेळ देणे गरजेचे आहे. एमआयडीसने पहल्या टप्प्यासाठी व दुस-या टप्प्यासाठी अधिग्रहण केलेले आहे. तर दराबाबतची मागणी उच्च प्रशासनाकडे नेण्यासाठी गठित समितीत स्थानिकांचा समावेश असणे आवश्यक आहे.

७) सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असून पर्यावरणाबाबत प्रकल्प अधिकारी यांनी सादरीकरण केलेले आहे. चार वर्षांनी रोजगार उपलब्ध होणार असल्याने स्थानिक युवक युवतींना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. त्यामुळे चार वर्षांनी स्थानिकांकडून रोजगाराची सेवा उपलब्ध होईल. गुणवत्ता वाढीसाठी प्रशिक्षण विभाग प्रकल्पात उपलब्ध असणे आवश्यक असून त्याबाबत पाठपुरावा करणे.

८) प्रकल्पामुळे भविष्यात अपेक्षित सुधारणा स्थानिक परिसरात होण्यासाठी सदरहू गठित समिती पुढील काळातही कार्यरत राहणे इष्ट होईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी समिती गठित करण्यासाठी स्थानिकांनी सूचना द्याव्यात व सहकार्य करावे असे आवाहन केले. त्यांनी सांगितले की जिल्हा प्रशासन हे समन्वयक म्हणून काम पाहिलं. भविष्यात सुधारणा करण्यासाठी एक समिती गठित करण्यात येईल. त्याची एक प्रत स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरिल सर्व मुद्द्यांवरिल चर्चेनंतर श्री आशिश, स्थानिक रहिवाशी यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा प्लॅस्टिक निर्मिती प्रकल्प असून सदरहू प्रकल्पात घातक रसायने वापरण्यात येणार आहेत. तर ही धरती जी जीवनदायीनी आहे, त्यास आपण प्रदूषित करायचे का याबाबत स्थानिकांनी विचार करणे गरजेचे आहे. कारण पॉलिमर हे प्लॅस्टिकपासूनच बनवले जाते. जागतिक तापमानात यामुळेच वाढ होते.

श्री दिलीप शिंदे, स्थानिक रहिवाशी यांना वरिल मुद्द्यांचे खंडन करत सांगितले की स्थानिकांना विकास हवा आहे. त्यासाठी प्रकल्पाची गरज आहे. हा भारत सरकारचा प्रकल्प असून त्यास स्थानिकांचा पूर्ण पाठिंबा आहे. उपस्थितांनी आपला पाठिंबा व्यक्त केला.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की स्थानिक जनतेने घेतलेली भूमिका वंदनीय असून त्यांना विकास हवा आहे. हा प्रशासनाचाही विजय आहे. स्थानिकांनी उपस्थित केलेले मुद्दे व मागण्या रास्त आहेत. प्रकल्पात स्थानिक भूमीपुत्रांना जे कुशल, अर्धकुशल व अकुशल आहेत, त्यांना भारत सरकारच्या नियमांप्रमाणे प्रकल्पात सामावून घेण्याची विनंती प्रशासन करेल.

बैठकीचा समारोप करताना, समन्वयक यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा बैठकीच्या इतिवृतांत समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत केंद्र शासनाच्या पर्यावरण वने, हवामान बदल मंत्रालयातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. सदरहू तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

समनव्यक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी यांनी बहुसंख्येने उपस्थित राहिलेल्या स्थानिक जनतेचे, प्रकल्प अधिकारी व शासकीय अधिकारी यांचे आभार मानले व बैठकीच कामकाज संपूर्ण झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

**समन्वयक,**
पर्यावरणविषयकजाहिर सुनावणी
तथा
उप प्रादेशिक अधिकारी-२,
मप्रनि मंडळ, नवी मुंबई

**सदस्य,**
पर्यावरणविषयकजाहिर सुनावणी
तथा
प्रादेशिक अधिकारी, रायगड.
मप्रनि मंडळ, नवी मुंबई

**अध्यक्ष,**
पर्यावरणविषयक जाहिर सुनावणी
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, रायगड